महावितरण (TM)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
प्रकाशगड, ५ वा मजला, स्टेशन रोड, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
दु.क्र.(ऑ.)२६४७४२११, २६४७२१३१ वि.क्र.३५०७ (वै.)२६४७४७५१ फॅक्सः ०२२.२६४७६२३३, २६४७२३१८

क्र. पीआर-३/कृषी / No 37046 दिनांकः 7 DEC 2010

**वाणिज्य परिपत्रक क्र.** - १३०

**विषय :** राज्यातील कृषी ग्राहकांकडून इंधन व इतरखर्च समायोजन आकार (फोका) /इंधन समायोजन आकार (एफ.ए.सी.) माफ करणेबाबत.

**संदर्भ** :- १) शासन निर्णय क्र.संकिर्ण-२००८/प्र.क्र.१८९६/ऊर्जा-५, दि. १ ऑक्टोबर २०१०.
२) मंडळ ठराव क्र १२९१ दि.२८.१०.२०१०.

राज्यातील वीज ग्राहकांना मा. विद्युत नियामक आयोगाने (यापुढे मा. आयोग) प्रथम दिनांक ३१.०७.२००१ ला इंधन व इतर समायोजन आकार (फोका) यांची आकारणी करुन ती सर्व ग्राहकांच्या वीज बिलात समाविष्ट करण्यास व त्याची वसूली करण्यास तत्कालीन वीज मंडळाला परवानगी दिली. त्यानंतर मा. आयोगाने वीज दराच्या अटी व शर्ती विनियम-२००५ जारी केल्या. दिनांक ०१.०९.२००५ पासून राज्यामध्ये सदर इंधन व इतर खर्च समायोजन आकाराच्या (फोका) ऐवजी केवळ इंधन समायोजन आकार (एफएसी) लागू करण्यात आला आहे. या आदेशानुसार सर्व ग्राहकांना (कृषीपंप ग्राहकांसह) बिले देण्यात येत आहेत.

मध्यंतरीच्या काळात शेतक-यांना फक्त सवलतीचा वीज दरच लावावा आणि इंधन व इतर आकार (फोका), मे २००० पासुन माफ करावा अशी मागणी कृषी ग्राहकांकडून सातत्याने येत होती. काही कृषी ग्राहकांनी त्यांच्या वीज बिलातील फोकाची रक्कम वगळून वीज बीले भरलेली आहेत. कृषीग्राहकांची रास्त मागणी शासनाने विचारात घेऊन शासन फेर निर्णय घेईपर्यंत कृषीग्राहकांकडून भागशः बिले (फोका किंवा एफ.ए.सी. वगळून) महावितरण कंपनीकडून स्विकारण्यात यावीत असा शासन निर्णय पत्र क्र. महाराष्ट्र शासनाचे अवर सचिव यांचे पत्र क्र. बैठक २००७/ आर.आर.११७५२/ऊर्जा-५ दि. ११.०३.२००८ अनुसार शासनाकडून निर्गमित करण्यात आला.

राज्यातील कृषीपंपधारक ग्राहकांच्या वीज बिलातील इंधन व इतर खर्च समायोजन आकार (फोका) व इंधन समायोजन आकार (एफएसी,) यांची मे, २००० ते मार्च २०१० पर्यंतची थकबाकी व त्यामुळे महावितरण कंपनी यांच्यावर पडलेला आर्थिक बोजा या कार्यालयाचे पत्र क्र. पी-कॉम/फोका/२२८९७ दि. २०.०७.२०१० नुसार महाराष्ट्र शासनास कळविण्यात आला होता.

या कार्यालयाकडून शासनास वारंवार पाठपुरावा व संदर्भिय विषय शासन विचाराधीन असल्याने, शासनाने शासन निर्णय क्र. संकिर्ण -२००८/प्र.क्र. १८९६/ ऊर्जा-५ दिनांक १ ऑक्टोबर २०१० रोजी निर्गमीत केला.शासन निर्णयानुसार राज्यातील कृषीपंपधारक ग्राहकांच्या वीज बिलातील इंधन व इतर खर्च समायोजन आकार (फोका) परतावा / Adjustment करण्याबाबतचा प्रस्ताव महावितरण कंपनीच्या संचालक मंडळाच्या बैठकीमध्ये मंजुरीसाठी ठेवण्यात आला.

मंजुर प्रस्तावाच्या अनुषंगाने मंडळ ठराव (Board Resolution) संचालक मंडळाच्या बैठकीत ठराव क्र. १२९१ दि.२८.१०.२०१० रोजी मंजुर करण्यात आला. त्या अनुषंगाने अधोरेखित बाबी खालीलप्रमाणे :

१) महाराष्ट्र शासनाचा शासन निर्णय क्र. संकिर्ण-२००८/प्र.क्र. १८९६/ ऊर्जा-५ दिनांक १ ऑक्टोबर २०१० हा निर्णय मान्य करण्याची संमती देण्यात येत आहे.

२) मे २००० ते मार्च २०१० या कालावधीत इंधन व इतर खर्च समायोजन आकार (फोका) व इंधन समायोजन आकार (एफएसी) ची मुळ थकबाकी व व्याजाची रक्कम (मार्च २०१० अखेर पर्यंतची) कृषीपंपधारकांच्या वीज बिलात स्वंतत्ररित्या दर्शविण्यात यावी व त्यावर १ एप्रिल २०१० पासून व्याज न लावणे.

३) दि. १.४.२०१० पासून राज्यातील सर्व कृषी ग्राहकांना त्यांच्या वीज बिलामध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने दिलेल्या आदेशाप्रमाणे आकारण्यात आलेला इंधन समायोजन आकार ग्राहकांकडून वसुल करण्यात यावा.

४) शासन निर्णयानुसार कृषीपंप ग्राहकांच्या इंधन व इतर खर्च समायोजन आकार (फोका) / इंधन समायोजन आकार (एफसीए) च्या रक्कमेवरील व्याजाची रक्कम रु. ८९१.६९ कोटी महावितरण कंपनीने माफ करावी.

५) महाराष्ट्र शासनाकडून शासन निर्णय दि. १ ऑक्टोबर २०१० नुसार महावितरण कंपनीस तीन वार्षिक हप्त्यात मिळणारा परतावा (एकूण रु. १५१८.७५ कोटी) खाली कोष्टकात दर्शविल्याप्रमाणे मिळाल्यावर त्याप्रमाणे हप्त्याच्या टक्केवारीच्या प्रमाणात कृषीपंपधारक ग्राहकांकडे असलेली मुळ थकबाकीची (एफ.ए.सी/फोका) रक्कम ग्राहकांच्या वीज बिलामध्ये समायोजित करण्यात यावी. तसेच शासनाकडून वार्षिक मिळणारा परतावा रकमेच्या हप्त्याच्या टक्केवारीच्या त्या त्या प्रमाणात महावितरणकडून कृषीपंप ग्राहकाकडे थकीत असलेली व्याजाची रक्कम रु. ८९१.६९ कोटी ग्राहकाच्या वीज बिलातून माफ करण्यात यावी.

| अ.क्र. | वर्ष | हप्ता संख्या | वितरणाची रक्कम रुपये (रु.कोटीत) |
|---|---|---|---|
| १. | २०१०-११ | पहिला | ५००.०० |
| २. | २०११-१२ | दुसरा | ९००.०० |
| ३. | २०१२-१३ | तिसरा | ११८.७५ |
| | | **एकुण** | **१५१८.७५** |

६) कृषी संजीवनी योजने अंतर्गत शासनाकडून प्राप्त अनुदानामध्ये (फोका/एफएसी) ची रक्कम समाविष्ठ असल्याने त्यापोटी रु. ७.१६ कोटी एवढी रक्कम महावितरणला यापुर्वीच प्राप्त झाली असल्याने सदर रक्कम (फोका/एफएसी) च्या एकुण रक्कमे मधून (रुपये १५१८.७५ कोटी ) वजा करण्यात यावी.

७) कृषीपंप धारकानी समायोजन आकाराची रक्कम भरलेली असल्यास परतावा रकमेच्या हप्त्याच्या टक्केवारीच्या प्रमाणात त्या ग्राहकांना तेवढया विज बिलाचा परतावा ग्राहकाच्या बिलात समायोजित करण्यात यावा. कोणत्याही परिस्थितीत रकमेचा परतावा रोखीत करण्यात येऊ नये.

८) महावितरण कंपनीने त्या त्या वर्षीच्या लेखा पुस्तिकेमध्ये शासनाकडून मिळालेल्या रक्कमेबाबतचा उल्लेख करुन त्याबाबतचा अनुपालन अहवाल शासनास जून २०११, जून २०१२ व जून २०१३ मध्ये सादर करावा.

सर्व क्षेत्रिय अधिका-यांना कळविण्यात येते की, वरील शासन निर्णयाची नोंद घेऊन त्या अनुषंगाने कार्यवाही करावी.

शे. ध. सोनवणे

**मुख्य अभियंता (वाणिज्य)**

**प्रत : प्रेषण यादीप्रमाणे**

१) मुख्य महाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)

--- यांना विनंती आहे की, संचालक मंडळाच्या ठरलेल्या ठरावाप्रमाणे मे २००० ते मार्च २०१० या कालावधीत इंधन व इतर खर्च समायोजन आकार (फोका) व इंधन समाजेन आकार (एफसीए) ची मूळ थकबाकी व व्याजाची रक्कम (मार्च २०१० अखेर पर्यंतची) कृषीपंपधारकांच्या वीज बिलात स्वतंत्ररित्या दर्शविण्यात यावी व त्या रकमेवर १ एप्रिल २०१० पासून व्याज लावू नये. तसेच शासनाकडून जसजशी रक्कम मिळेल त्याप्रमाणे त्या त्या वर्षी त्या रकमेवरील व्याज निर्लेखीत करावे.

२) मुख्य महाव्यवस्थापक (लेखा)

---- शासनाकडून मिळणा-या रकमेची लेखा पुस्तिकेमध्ये येणे म्हणून नोंद घ्यावी व मिळाल्यावर योग्य ती कार्यवाही करुन तेवढया रकमेच्या प्रमाणात व्याजाची रक्कम निर्लेखीत (माफ) करावे.